पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – २१८**

(सभावृत्तांत)

**दिनांक – १५/०४/२०२१** **वेळ – दु.२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा गुरूवार दिनांक **१५/०४/२०२१** रोजी **दुपारी २.३० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे काही सन्मा. सदस्य सभागृहात तसेच काही सन्मा.सदस्य ऑनलाईन/ व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित होते.

**१. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे – सभापती**
२. मा.कदम शशिकांत गणपत
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.संतोष बबन कांबळे
५. मा.अभिषेक गोविंद बारणे
६. मा.बुर्डे सुवर्णा विकास
७. मा.फुगे भिमाबाई पोपट
८. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
९. मा.सुलक्षणा राजू धर
१०. मा.भोईर सुरेश शिवाजी
११. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
१२. मा.यादव मीनल विशाल
१३. मा.भालेकर प्रविण महादेव
१४. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
१५. मा.पाडाळे निता विलास

याशिवाय मा.राजेश पाटील – आयुक्त, मा.विकास ढाकणे – अति.आयुक्त (१), मा.उल्हास जगताप – नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त(३), मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील – शहर अभियंता, मा.डॉ.राय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.इंगळे, मा.चारठाणकर, मा.चितळे, मा.दुरगुडे, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत – उप आयुक्त, मा.निकम, मा.भालकर, मा.सवणे, मा.तांबे – सह शहर अभियंता, मा.लडकत, मा.खाबडे – प्र.सह शहर अभियंता, मा.खांडेकर, मा.शिंदे,– सहाय्यक आयुक्त, मा.गायकवाड – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.पाटील – प्राचार्य औ.प्र.केंद्र, मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता वायसीएमएच,

मा.इंगळे, मा.चव्हाण, मा.जुंधारे, मा.मोरे, मा.देशमुख, मा,सेठिया, मा.काळे, मा.टकले – कार्यकारी अभियंता, मा.जगताप – कामगार कल्याण अधिकारी, मा.गावडे, मा.हराळे, मा.देशमुख – प्रशासन अधिकारी तथा प्रभारी क्षेत्रिय अधिकारी, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी, मा.गोफणे – सहा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.माने - लेखाधिकारी (PMPML) हे अधिकारी उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.४२) मौजे तळवडे येथील गट क्र.३८० पैकी इंद्रायणी नदी लगत म.औ.वि.म. च्या सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क क्षेत्रातील भुखंड क्र.बी-२ मधील ४००० चौ.मी. जागा महानगरपालिकेच्या नियोजित अशुध्द जलउपसा केंद्रासाठी हस्तांतरीत करून मिळणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.४३) अग्निशमन केंद्र सुरू करणेबाबत – मा.राजू बनसोडे, मा.प्रविण भालेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४४) सार्वजनिक शौचालय उभारणेबाबत. - मा.राजू बनसोडे, मा.प्रविण भालेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४५) दापोडी येथे जलतरण तलाव उभारणेबाबत. - मा.राजू बनसोडे, मा.प्रविण भालेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४६) मा.आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या मागणीनुसार कोरोना प्रादुर्भावाच्या धर्तीवर लॉकडाऊनच्या काळात आर्थिक दुर्बल घटकांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहसाठी तातडीची आर्थिक मदत करणेबाबत. – मा.शशिकांत कदम, मा.शत्रुघ्न काटे यांचा प्रस्ताव.

----------

ठराव क्रमांक – ९२०४ विषय क्रमांक – ०१
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/अ-मुख्य/४३/२०२१, दि.२६/०२/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.22/18/2020-21 अन्वये प्रभाग क्र.१४ मधील काळभोरनगर मोहननगर परिसरातील डांबरी रस्त्यांची दुरुस्तीची कामे करणेकामी M/s.ANANYA BUILDCOM नि.र.रू.37,49,954/- (अक्षरी र.रु.सदतीस लाख एकोणपन्नास हजार नऊशे चौपन्न फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.36,81,304/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.36,81,304/- पेक्षा 42.57% कमी म्हणजेच र.रु.21,14,173/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.1,555/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.68,650/- = एकुण र.रु.21,84,378/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच

निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२०५ विषय क्रमांक – ०२

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/अ-मुख्य/४४/२०२१, दि.२६/०२/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.22/17/2020-21 अन्वये प्रभाग क्र.१४ आकुर्डी दत्तवाडी परिसरातील डांबरी रस्त्यांवरील चरांची दुरुस्ती करणेकामी M/s.ANANYA BUILDCOM नि.र.रू.37,49,968/- (अक्षरी र.रु.सदतीस लाख एकोनपन्नास हजार नऊशे अडुसष्ठ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.36,81,318/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.36,81,318/- पेक्षा 42.57% कमी म्हणजेच र.रु.21,14,181/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.1,696/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.68,650/- = एकुण र.रु.21,84,527/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२०६ विषय क्रमांक – ०३

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – क्रीडा

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/२९७/२०२१, दि.२४/१२/२०२१

विषय - मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतीक समिती सभा ठराव क्र.२३ दि.२६/०२/२०२१

विषय क्र.३ चा विचार दि.१२/०५/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२०७ विषय क्रमांक – ०४

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.विमुका/८/कावि/११५/२०२१, दि.०२/०३/२०२१

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.34-19/2020-2021 अन्वये गहुंजे हद्दी लगतचे डी.पी.रस्त्यापासून देहुरोड रस्त्यापर्यंत लेखाफार्मच्या एक्सप्रेस हायवेलगतच्या 12.00 मी. चा रस्ता विकसित करणेकामी मे.एस.टी.इलेक्ट्रीक प्रा.लि. नि.र.रू.1,36,75,233/- (अक्षरी र.रु.एक कोटी छत्तीस लाख पंच्याहत्तर हजार दोनशे तेहतीस फक्त) पेक्षा 27% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.99,82,920/- पर्यंत काम करून घेणेस, निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेकरीता मंजूरीकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२०८ विषय क्रमांक – ०५

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – जलनि:सारण मुख्यालय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/३९२/२०२१, दि.०५/०३/२०२१

विषय - च-होली मैलाशुद्धीकरण केंद्राअंतर्गत प्रभाग क्र.3 मधील मोशी गावठाण व शिवाजीवाडी, लक्ष्मीनगर, आदर्शनगर, गंधर्वनगरी, डुडुळगाव, शास्त्रीचौक परिसरात मलनि:सारण विषयक कामे करणेबाबत.

विषय क्र.५ चा विचार दि.१२/०५/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२०९ विषय क्रमांक – ०६

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांचे पत्र क्र.विमुका/६/कावि/३४४/२०२१, दि.१५/०३/२०२१

विषय - प्र.क्र.८ से.क्र.४ मोकळी जागा क्र.४ येथे विरंगुळा केंद्र व उद्यान उभारणेबाबत.

विषय क्र.६ चा विचार दि.१२/०५/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२१० विषय क्रमांक – ०७

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – स्थापत्य इ मुख्यालय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/३०८/२०२१, दि.१९/०३/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.24/12/2020-21 अन्वये प्रभाग क्र.५ मधील मनपा इमारतींची व आरक्षणाची किरकोळ दुरुस्तीची व देखभालची कामे करणेकामी मे.अनन्या बिल्डकॉन नि.र.रू.47,81,586/- (अक्षरी र.रु.सत्तेचाळीस लाख ऐक्याऐंशी हजार पाचशे शहाऐंशी फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.47,43,037/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.47,43,037/- पेक्षा 36.97% कमी म्हणजेच र.रु.29,89,536/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.12,356/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.38,550/- = एकुण र.रु.30,40,442/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२११ विषय क्रमांक – ०८

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – ड क्षेत्रिय, विद्युत

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.डक्षेका/१/कावि/१८६/२०२१, दि.०१/०४/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

कोरोना विषाणूचा (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे करीता ड क्षेत्रिय कार्यालयांतर्गत तात्पुरत्या स्वरूपात विद्युत व्यवस्था करणे व अनुषंगिक कामे करणे या कामाचे वाढीव खर्च र.रू.२०,१८,२९१/- (अक्षरी र.रू.वीस लाख अठरा हजार दोनशे एक्यान्नव फक्त) सुधारित खर्च र.रू.४९,९४,२३३/- यांस तसेच सदरचे काम मे.कमल इलेक्ट्रीक एंटरप्राझेस या एजन्सी कडून पुर्व स्विकृत निविदा दर ५.५% कमी या दराने सुधारित रितसर करारनामा करून सुधारित प्रशासकिय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२१२ विषय क्रमांक – ०९

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – वायसीएमएच

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.YCMH/१७/कावि/७४/२०२१, दि.१२/०३/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयातील बायोमेडीकल वेस्ट परवान्याचे नुतनीकरण

सन २०१७ पासुन ते सन २०२२ या कलावधीपर्यंत करणेकामी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांना र.रू.२,५०,०००/- (अक्षरी र.रू.दोन लाख पन्नास हजार फक्त) अदा करणे आवश्यक आहे. सदरची रक्कम सन २०२०-२०२१ करीता पी.जी.आय., वाय.सी.एम.एच., पी.सी.एम.सी., करीता विविध शासकीय संस्था व विद्यापीठ इ. चे शुल्क भरणे या लेखाशिर्षावरील असणारी तरतुद र.रू.१,५०,००,०००/- मधून खर्ची करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२१३ विषय क्रमांक – १०

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – मुख्य लेखा परीक्षण

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे पत्र क्र.मुलेप/४/कावि/२४/२०२१, दि.३१/०३/२०२१

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपाचे सन २०१५-२०१६ ते २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखे तयार करुन ते मा.स्थायी समिती पुढे मान्यतेकामी सादर करण्यात आलेले होते.त्यास मा.स्थायी समिती सभेने अनुक्रमे ठराव क्र.६६० दि.१९/७/२०१७ ठराव क्र.२७३२, दि.३०/५/२०१८ ठराव क्र.५२५० दि.२२/८/२०१९ व ठराव क्र.७२७२, दि.२/८/२०२० अन्वये मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ कलम १०६ नुसार उपरोक्त नमुद चार वर्षांच्या वार्षिक लेख्यांचे लेखापरिक्षण करुन त्याचा अहवाल सोबत जोडण्यात आलेला आहे. तसेच मा.आयुक्त यांनी केलेल्या सुचनेनुसार महानगरपालिकेच्या सन २०१५-२०१६ ते २०१८-२०१९ या कालावधीच्या खाजगी सनदी लेखापाल यांनी तयार केलेल्या उत्पन्न व खर्चपत्रक आणि ताळेबंद यांचेदेखील लेखापरिक्षण करुन अहवाल मा. आयुक्त यांना पत्र क्र.

१) मुलेप/४/कावि/५/२०२०, दि. १८/८/२०२० (सन २०१६-२०१७ व २०१७-२०१८)

२)मुलेप/४/कावि/५६/२०२०, दि.२९/१०/२०२० (सन २०१८-२०१९)

३) मुलेप/४/कावि/१/२०२१, दि. ४/१/२०२१ (सन २०१५-२०१६)

पाठविण्यात आलेले आहेत. त्वरीत संदर्भासाठी त्याच्या प्रती सोबत जोडलेल्या असुन ते अहवाल आता सदर अहवालाचा भाग आहेत. तसेच महिला बाल कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणा-या महिलांसाठी योजनांच्या फलनिष्पतीबाबत निर्गमित पत्र क्र. मुलेप/गट-४/कावि/२४/२०, दि.१३/३/२०२० हे देखील अहवालाचा भाग आहे. सदरहु पत्र सोबत संलग्न केलेले आहे. सबब सन २०१५-२०१६ ते २०१८-२०१९ या चार आर्थिक वर्षांच्या वार्षिक लेख्यांचा लेखापरिक्षण अहवालास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२१४ विषय क्रमांक – ११

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.निता पाडाळे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांचे पत्र क्र.विमुका/५/कावि/१९७/२०२१, दि.२५/०३/२०२१

मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.34-04/2020-2021 अन्वये इ क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत प्रभाग क्र.३,४,५ व ७ मधील विविध मनपा इमारती, उद्याने व रस्त्यावर आवश्यकते प्रमाणे सी.सी.टी.व्ही यंत्रणा बसवणे व अनुषंगिक कामे करणेकामी (सन २०२०-२१) मे.फिनिक्स इन्फ्रास्ट्रक्चर्स नि.र.रू.29,97,237/- (अक्षरी र.रु.एकोणतीस लाख सत्यान्नव हजार दोनशे सदतीस फक्त) पेक्षा 3.54% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.28,91,135/- पर्यंत काम करून घेणेस, निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेकरीता मंजूरीकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२१५ विषय क्रमांक – १२

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.विमुका/५/कावि/१९६/२०२१, दि.२५/०३/२०२१

विषय - प्रभाग क्र.३ मोशी येथील मोरया कॉलनी फातिमानगर, खानदेशनगर, संत ज्ञानेश्वर नगर इ. ठिकाणचे रस्ते अद्यावत पद्धतीने विकसीत करणे या कामातील विद्युत विषयक कामे करणेबाबत.

विषय क्र.१२ चा विचार दि.१२/०५/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२१६ विषय क्रमांक – १३

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – वैद्यकिय मुख्यालय

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/१०/कावि/२३१/२०२१, दि.०४/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

केंद्र व राज्य शासनाच्या सुचनांनुसार कोविड-१९ वैश्विक महामारीच्या नियंत्रणासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या लसीकरण केंद्रांमध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कोविड लसीकरण कार्यक्रम दि.१६ जानेवारी २०२१ पासून राबविण्यात येत आहे. सदर लसीकरण कार्यक्रमामध्ये नोंदणीकृत आरोग्य सेवा देणारे व फ्रंन्ट लाईन वर्कर, ६० वर्षावरील व्यक्ती तसेच ४५ ते ६० या वयोगटातील दुर्धर आजार असलेल्या व्यक्तींचे लसीकरण करण्यात येत आहे. सदर लसीकरण कार्यक्रमामध्ये नागरिकांना लस देणे, याबाबतची माहिती पोर्टलवर भरणे, लसीकरण पुर्ण झाल्यानंतर अहवाल सादर करणे या कामकाजासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडील मनुष्यबळ अपुरे पडत असल्यामुळे व प्रशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता असल्यामुळे डाटा एन्ट्री ऑपरेटर (स्वयंसेवक) यांची ३० दिवसाकरीता तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करणेत आलेली आहे. प्रस्तावात नमूद प्रमाणे सदर डाटा एन्ट्री ऑपरेटर (स्वयंसेवक) यांना प्रति महिना

र.रू.१०,०००/- प्रमाणे मानधन देणेकामी येणारा खर्च र.रु.६,४०,०००/- (अक्षरी र.रु.सहा लाख चाळीस हजार फक्त) अथवा प्रत्यक्ष होणारा खर्च भांडार विभागाकडील “कोरोना निधी” या लेखाशिर्षकामधून करण्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२१७ | विषय क्रमांक – १४

दिनांक – १५/०४/२०२१ | विभाग – वैद्यकिय मुख्यालय

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे | अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/२७९/२०२१, दि.०४/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये सध्या कोरोना (कोविड-१९) रुग्ण झपाट्याने वाढत चालले आहेत. फेब्रुवारी २०२१ च्या दुस-या आठवड्या पासुन कोरोना बाधीतांची संख्या दिवसें दिवस वाढू लागलेली आहे. रुग्ण संख्या झपाट्याने वाढत असल्याने घरकुल येथील डी-५,६,७,८ हे कोविड सेंटर दोन महीन्याकरीता तातडीने चालु करणेत आलेले आहेत. वाढती रुग्णसंख्या विचारात घेऊन पुढील कोविड सेंटर चालु करणेकामी सुचना दिलेल्या आहेत. मे.डिव्हाइन सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल अँन्ड ट्रामा सेंटर यांना पत्र क्र.मसाभां/४/कावि/२५०ए/२०२१ दि.२६.०३.२०२१ अन्वये पत्र देऊन जुन्या दराने काम करण्यास तयार आहात किंवा कसे या बाबत विचारणा करण्यात आले असता त्यांचे कडील दि.२६.०३.२०२१ चे पत्रान्वये जुन्या दराने काम करण्यास तयार असले बाबत कळविले आहे. भारतीय साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३) क नुसार कोरोना विषाणुचा (COVID-19) प्रादुर्भाव लक्षात घेता सदर बाब तातडीची असेलेने मे.डिव्हाइन सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल अँन्ड ट्रामा सेंटर यांना चिखली येथील इमारत क्र.बी–१० येथील कोविड सेंटर दि.२७.०३.२०२१ ते २६.०५.२०२१ पर्यंत (६१ दिवस) दोन महीने २०० बेड पर्यंत कोविड केअर सेंटर चालविणेस देणेबाबत र.रु.६६,२४,६००/- (अक्षरी र.रू.सहासष्ठ लाख चौवीस हजार सहाशे फक्त) चे कामकाज आदेश EOI क्र.०३/२०२०-२१ मधील अटी शर्ती आणि करारनाम्यास अधीन राहून पूर्वीच्या मंजूर दराने देणेत आलेला असल्याने कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२१८ | विषय क्रमांक – १५

दिनांक – १५/०४/२०२१ | विभाग – वैद्यकिय मुख्यालय

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे | अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/२८०/२०२१, दि.०४/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये सध्या कोरोना (कोविड-१९) रुग्ण झपाट्याने वाढत चालले आहेत. फेब्रुवारी २०२१ च्या दुस-या आठवड्या पासुन कोरोना बाधीतांची संख्या दिवसें दिवस वाढू लागलेली आहे. रुग्णसंख्या झपाट्याने वाढत असल्याने घरकुल येथील डी-५,६,७, ८ हे कोविड सेंटर दोन महीन्याकरीता तातडीने चालु करणेत आलेले आहेत. वाढती

रुग्णसंख्या विचारात घेऊन पुढील कोविड सेंटर चालु करणेकामी सुचना दिलेल्या आहेत. मे.डिव्हाइन सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल अँन्ड ट्रामा सेंटर यांना पत्र क्र.मसाभां/४/कावि/२५०ए/२०२१ दि.२६.०३.२०२१ अन्वये पत्र देऊन जुन्या दराने काम करण्यास तयार आहात किंवा कसे या बाबत विचारणा करण्यात आले असता त्यांचे कडील दि.२६.०३.२०२१ चे पत्रान्वये जुन्या दराने काम करण्यास तयार असले बाबत कळविले आहे. भारतीय साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३) क नुसार कोरोना विषाणुचा (COVID-19) प्रादुर्भाव लक्षात घेता सदर बाब तातडीची असेलेने मे.डिव्हाइन सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल अँन्ड ट्रामा सेंटर यांना चिखली येथील इमारत क्र. बी–१२ येथील कोविड सेंटर दि.२७.०३.२०२१ ते २६.०५.२०२१ पर्यंत (६१ दिवस) दोन महीने २०० बेड पर्यंत कोविड केअर सेंटर चालविणेस देणे बाबत र.रु.६६,२४,६००/- (अक्षरी र.रू.सहासष्ठ लाख चोवीस हजार सहाशे फक्त) चे कामकाज आदेश EOI क्र.०३/२०२०-२१ मधील अटीशर्ती आणि करारनाम्यास अधीन राहून पूर्वीच्या मंजूर दराने देणेत आलेले असल्याने कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२१९ विषय क्रमांक – १६

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – वैद्यकिय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/२८१/२०२१, दि.०४/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये फेब्रुवारीच्या दुस-या आठवड्यात कोरोना रुग्णांची संख्या पुन्हा वाढू लागली आहे. सध्या महानगरपालिके मार्फत अँटो क्लस्टर येथे ५० बेड आयसीयु चालु करण्यात आलेले आहे. या कामी दि.०३.०९.२०२१ रोजी आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच वायसीएमएच येथील १५ बेडचे दोन आयसीयु ऑगस्ट-२०२० पासुन चालु करण्यात आलेले आहेत. जुलै महीन्यामध्ये कोरोना प्रादुर्भाव वाढला असता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे (PMRDA) यांचे कडुन EOI क्र.०३/२०२०-२१ प्रसीध्द करण्यात आला होता. त्या मध्ये मे.मेडब्रोज हेल्थकेअर डायग्नोस्टिक सेंटर कामाचे आदेश क्र.EG/BCH/07.20/प्र.क्र६१२/१३००/शाखा-१ दि.२४.०८.२०२० देण्यात आलेले होते. मा.आयुक्त, मा.महापौर, मा.अति.आयुक्त क्र.१ तसेच इतर पदाधिकारी आणि अधिकारी यांचे समवेत दिनांक २२.०३.२०२१ रोजी मिटींग आयोजीत केली असता झालेल्या चर्चे प्रमाणे कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथील जंबो कोविड रुग्णालय सध्या २०० बेड साठी (त्यामध्ये १०० बेड ऑक्सीजन युक्त, ५० आयसीयु, ५० एचडियु) दोन महिने कालावधीसाठी चालु करणेकामी आदेश देण्यात आलेले आहेत. मे.मेडब्रोज हेल्थकेअर डायग्नोस्टिक सेंटर यांचे कडुन पुढील प्रमाणे दर आकारण्यात आलेले होते.

१. ऑक्सीजन युक्त बेड र.रु.१४०४.४८ प्रति बेड प्रति दिन.

२. एचडियु बेड र.रु.३८४३.८४ प्रति बेड प्रति दिन.

३. आयसीयु बेड र.रु.४३८५.९२ प्रति बेड प्रति दिन.

पुढील २०० बेडसाठी मे.मेडब्रोज हेल्थकेअर डायग्नोस्टिक सेंटर यांचेकडुन मनुष्यबळ उपलब्ध करुन घेतले जाणार आहे. रुग्णांना जेवण महानगरपालिके मार्फत पुरविण्यात येणार आहे. या साठी त्यांना

PMRDA कडील मुळ आदेशामध्ये नमुद केले प्रमाणे तसेच पुणे महानगरपालिके कडील आदेशातील व करारनाम्यातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहणार आहेत. वाढती रुग्णसंख्या विचारात घेता वाढीव २०० बेडसाठी (१० आयसीयु, ९० एचडीयु, १०० ऑक्सीजन युक्त) आदेश देण्यात आलेले आहेत. याकामी येणारा खर्च एकूण र.रु.३,२३,४५,४२१/- (अक्षरी र.रू.तीन कोटी तेवीस लाख पंचेचाळीस हजार चारशे एकवीस फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२२० विषय क्रमांक – १७

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – मध्य.सा.भां., वैद्यकिय

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.निता पाडाळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/३६०/२०२१, दि.३१/०३/२०२१

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या वाय.सी.एम. रुग्णालयात कोरोना बाधित रुग्ण मरण पावल्यास त्यावर Expression of Interest मध्ये निर्देशित केलेप्रमाणे योग्य तो प्रोटोकॉल पाळुन मृतदेहासंबंधी कामकाज करण्यासाठी पुर्वीचा आदेश दि.२८/०२/२०२१ रोजी संपुष्टात येणार असल्याने अधिष्ठाता, PGI, YCMH यांनी दि.१३/०३/२०२१ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या विनंतीनुसार M/s.Jai Bhawani Enterprises यांना त्यांचे समवेत पुर्वी झालेल्या करारनाम्यास अधिन राहून सध्या Covid-19 च्या रुग्ण संख्येत वाढ झाल्याने प्रस्तावात नमूद प्रमाणे M/s.Jai Bhawani Enterprises पुढील दोन महिने कालावधीसाठी म्हणजे दि.०१/०३/२०२१ ते दि.३०/०४/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यास र.रु.२८,०२१/- प्रति कर्मचारी प्रति महा प्रमाणे १६ कर्मचा-यांसाठी प्रतिमहा र.रु.४,४८,३३६/- प्रमाणे २ महिन्यांकरीता येणा-या र.रु.८,९६,६७२/- (अक्षरी र.रू.आठ लाख शहान्नव हजार सहाशे बाहत्तर फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२२१ विषय क्रमांक – १८

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – वैद्यकिय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/२८६/२०२१, दि.०४/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये प्रथम टप्प्यामध्ये कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता खाजगी कोविड केअर सेंटर चालु करण्याचा निर्णय दिनांक ०८.०७.२०२० चे मान्य प्रस्तावान्वये घेणेत आला. या प्रमाणे Expression Of Interest (EOI) क्र.०३/२०२०-२१ प्रसिध्द करणेत आली होती. सदर EOI बी वर्गवारीसाठी प्रसिध्द करणेत आली होती. त्यामध्ये संबंधित संस्था/रुग्णालयांकडुन फक्त कर्मचारी पुरविणेकामी कळविले होते. या EOI मधील अटी शर्ती प्रमाणे The Minimum payment guaranteed shall be 80% occupancy irrespective of actual occupancy. For occupancy above 80% actual occupancy charges shall be payable. या प्रमाणे नमूद करण्यात आले होते. मे.डॉ.भिसे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, यांनी सदर EOI मध्ये भाग घेतला होता. त्यांनी ३०० बेडसाठी र.रु.५००/- प्रति दिन प्रती बेड या प्रमाणे दर सादर

केला होता. त्यांचे दरास मा.आयुक्त यांचेकडुन दि.२१.०७.२०२० रोजी मान्यता देणेत आलेली आहे. मे.डॉ.भिसे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, यांचे खर्चास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.७४८८ दि.२३.०९.२०२० अन्वये मान्यता घेणेत आलेली होती. त्या प्रमाणे त्यांचे बरोबर करारनामा करणेत येऊन त्यांना आमुका/११/कावि/१८८/२०२० दि.२९.०७.२०२० अन्वये र.रु १,३५,००,०००/- चे ३०० बेडकरीता र.र.५४३/- प्रति दिन प्रति बेड या प्रमाणे म्हाळुंगे येथील म्हाडा वसाहत ११ सी साठी ९० दिवसांकरीता आदेश देण्यात आलेले होते. ऑक्टोबर महीन्यात कोरोना रुग्ण बाधीतांची संख्या कमी होत गेली होती म्हणुन सदर कोविड सेंटर अति.आयुक्त क्र.२ यांचेकडील आदेश क्र.भुजी/२/कावि/६०७/२०२० दि.०१.१०.२०२० अन्वये बंद करणेत आलेले आहे. सध्या कार्यरत असलेले बालनगरी येथील कोविड केअर सेंटर, महानगरपालिकेने चालु केलेले अँटो क्लस्टर येथील जंबो कोविड हॉस्पिटल पूर्ण क्षमतेने चालु आहे. कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथील जंबो कोविड रुग्णालय ४०० बेडसाठी चालु करणेत आलेले आहे. EOI क्र.०३/२०२०-२१ मधील अटी शर्ती प्रमाणे पूर्वीच्या मंजूर दराने काम करण्यात यावे अशा सुचना मा.आयुक्त, मा.महापौर यांच्या बैठकीत दिलेल्या आहेत तसेच झालेल्या चर्चे प्रमाणे प्रथम डी-५ आणि डी-६ मधील एकूण ४०० बेडसाठी चालु करणेकामी आणि दोन्ही सेंटर ५०% भरलेनंतर पुढील इमारतींमध्ये कोविड केअर सेंटर (CCC) सुरु करण्याची कार्यवाही करण्यात यावी या बाबतचा सभावृत्तांत करणेत आलेला आहे. या निर्णयाप्रमाणे घरकुल येथील इमारत क्र. डी-५ आणि डी-६,७,८ बी -१०,१२ मध्ये रुग्ण दाखल करणेत आले आहेत. कोविडसाठी कार्यकारणी समिती गठीत करण्यात आलेली आहे त्या समितीच्या दिनांक २३.०३.२०२१ रोजी झालेल्या मिटींग मधील निर्णया प्रमाणे आणि मा.विभागीय आयुक्त कार्यालयाकडुन सूचना प्राप्त झाल्याप्रमाणे आपत्कालीन बाब म्हणून मान्यता देण्यात आली आहे. मे.डॉ.भिसे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, यांना तातडीची बाब म्हणुन म्हाळुंगे येथील म्हाडा वसाहत ११ सी येथे ३०० बेडसाठी कोविड केअर सेंटर चालु करणे बाबत र.रु.९१,५०,०००/- (अक्षरी र.रू.एक्यान्नव लाख पन्नास हजार फक्त) दि.०६.०४.२०२१ ते ०५.०६.२०२१ पर्यंत चे कामकाज आदेश देणेत आलेला असल्याने सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२२२ विषय क्रमांक – १९

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – वैद्यकिय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/२८४/२०२१, दि.०४/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये प्रथम टप्प्यामध्ये कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता खाजगी कोविड केअर सेंटर चालु करण्याचा निर्णय दिनांक ०८.०७.२०२० चे मान्य प्रस्तावान्वये घेणेत आला. या प्रमाणे Expression Of Interest (EOI) क्र.०३/२०२०-२१ प्रसिध्द करणेत आली होती. सदर EOI बी वर्गवारी साठी प्रसिध्द करणेत आली होती. त्यामध्ये संबंधीत संस्था/रुग्णालयांकडुन फक्त कर्मचारी पुरविणेकामी कळविले होते. या EOI मधील अटी शर्ती प्रमाणे The Minimum payment guaranteed shall be 80% occupancy irrespective of actual occupancy. For occupancy above 80% actual occupancy charges shall be payable. या प्रमाणे नमूद करण्यात आले होते. मे.ट्रस्ट हेल्थ केअर यांनी सदर

EOI मध्ये भाग घेतला होता. त्यांनी १०० बेडसाठी र.रु.६९९/- प्रति दिन प्रती बेड या प्रमाणे दर सादर केला होता. त्यांचे दरास मा.आयुक्त यांचेकडुन दि.२१.०७.२०२० रोजी मान्यता देणेत आलेली आहे. मे.ट्रस्ट हेल्थ केअर यांचे खर्चास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.७४८८ दि.२३.०९.२०२० अन्वये मान्यता घेणेत आलेली होती. त्याप्रमाणे त्यांचेबरोबर करारनामा करणेत येऊन त्यांना आमुका/११/कावि/१९८/२०२० दि.०३.०८.२०२० अन्वये र.रु.६२,९१,०००/- चे १०० बेडकरीता र.र.६९९/- प्रति दिन प्रति बेड या प्रमाणे मागसवर्गीय मुलांचे हॉस्टेल, मोशीसाठी ९० दिवसांकरीता आदेश देण्यात आलेले होते. ऑक्टोबर महीन्यात कोरोना रुग्ण बाधीतांची संख्या कमी होत गेली होती म्हणुन सदर कोविड सेंटर अति. आयुक्त क्र.२ यांचेकडील आदेश क्र.आमुका/११/कावि/२८०/२०२० दि.१५.१०.२०२० अन्वये बंद करणेत आलेले आहे. सध्या कार्यरत असलेले बालनगरी येथील कोविड केअर सेंटर, महानगरपालिकेने चालु केलेले अँटो क्लस्टर येथील जंबो कोविड हॉस्पिटल पूर्ण क्षमतेने चालु आहे. कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथील जंबो कोविड रुग्णालय ४०० बेडसाठी चालु करणेत आलेले आहे. EOI क्र.०३/२०२०-२१ मधील अटी शर्ती प्रमाणे पूर्वीच्या मंजूर दराने काम करण्यात यावे अशा सुचना मा.आयुक्त, मा.महापौर यांच्या बैठकीत दिलेल्या आहेत तसेच झालेल्या चर्चे प्रमाणे प्रथम डी-५ आणि डी-६ मधील एकूण ४०० बेडसाठी चालु करणेकामी आणि दोन्ही सेंटर ५०% भरलेनंतर पुढील इमारतींमध्ये कोविड केअर सेंटर (CCC) सुरु करण्याची कार्यवाही करण्यात यावी या बाबतचा सभावृत्तांत करणेत आलेला आहे. या निर्णयाप्रमाणे घरकुल येथील इमारत क्र. डी-५ आणि डी-६,७,८ बी-१०,१२ मध्ये पूर्ण क्षमतेने रुग्ण दाखल झालेले आहेत. कोविडसाठी कार्यकारणी समिती गठीत करण्यात आलेली आहे त्या समितीच्या दिनांक २३.०३.२०२१ रोजी झालेल्या मिटींग मधील निर्णया प्रमाणे आणि मा.विभागीय आयुक्त कार्यालयाकडुन सूचना प्राप्त झाल्याप्रमाणे आपत्कालीन बाब म्हणून मान्यता देण्यात आली आहे. मे.ट्रस्ट हेल्थ केअर यांना तातडीची बाब म्हणुन मागसवर्गीय मुलांचे हॉस्टेल, मोशी येथे १०० बेडसाठी कोविड केअर सेंटर चालु करणेबाबत र.रु.४२,६३,९००/- (अक्षरी र.रू.बेचाळीस लाख त्रेसष्ठ हजार नऊशे फक्त) दि.०६.०४.२०२१ ते ०५.०६.२०२१ पर्यंत चे कामकाज आदेश देणेत आलेले असल्याने सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२२३ विषय क्रमांक – २०

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – वैद्यकिय

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/२८३/२०२१, दि.०४/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये प्रथम टप्प्यामध्ये कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता खाजगी कोविड केअर सेंटर चालु करण्याचा निर्णय दिनांक ०८.०७.२०२० चे मान्य प्रस्तावान्वये घेणेत आला. या प्रमाणे Expression Of Interest (EOI) क्र.०३/२०२०-२१ प्रसिध्द करणेत आली होती. सदर EOI बी वर्गवारी साठी प्रसिध्द करणेत आली होती. त्यामध्ये संबंधीत संस्था/रुग्णालयांकडुन फक्त कर्मचारी पुरविणेकामी कळविले होते. या EOI मधील अटी शर्ती प्रमाणे The Minimum payment guaranteed shall be 80% occupancy irrespective of actual occupancy. For occupancy above 80% actual occupancy charges shall be payable. या प्रमाणे नमूद करण्यात आले होते. मे.बि.व्ही.जी इंडिया लि. यांनी

सदर EOI मध्ये भाग घेतला होता. त्यांनी २०० बेडसाठी र.रु.५४३/- प्रति दिन प्रती बेड या प्रमाणे दर सादर केला होता. त्यांचे दरास मा.आयुक्त यांचेकडुन दि.२१.०७.२०२० रोजी मान्यात देणेत आलेली आहे. मे.बि.व्ही.जी इंडिया लि. यांचे खर्चास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.७४८८ दि.२३.०९.२०२० अन्वये मान्यता घेणेत आलेली होती. त्या प्रमाणे त्यांचे बरोबर करारनामा करणेत येऊन त्यांना आमुका/११/कावि/१८५/२०२० दि.२९.०७.२०२० अन्वये र.रु.९७,७४,०००/- चे २०० बेडकरीता र.र.५४३/- प्रति दिन प्रति बेड या प्रमाणे बालेवाडी स्पोर्टस कॉम्पलेक्ससाठी ९० दिवसांकरीता आदेश देण्यात आलेले होते. ऑक्टोबर महीन्यात कोरोना रुग्ण बाधीतांची संख्या कमी होत गेली होती म्हणुन सदर कोविड सेंटर अति. आयुक्त क्र.२ यांचेकडील आदेश क्र.आमुका/११/कावि/२८०/२०२० दि.१५.१०.२०२० अन्वये बंद करणेत आलेले आहे. सध्या कार्यरत असलेले बालनगरी येथील कोविड केअर सेंटर, महानगरपालिकेने चालु केलेले अँटो क्लस्टर येथील जंबो कोविड हॉस्पिटल पूर्ण क्षमतेने चालु आहे. कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथील जंबो कोविड रुग्णालय २०० बेडसाठी चालु करणेत आलेले आहे. EOI क्र.०३/२०२०-२१ मधील अटी शर्ती प्रमाणे पूर्वीच्या मंजूर दराने काम करण्यात यावे अशा सुचना मा.आयुक्त, मा.महापौर यांच्या बैठकीत दिलेल्या आहेत तसेच झालेल्या चर्चे प्रमाणे प्रथम डी-५ आणि डी-६ मधील एकूण ४०० बेडसाठी चालु करणेकामी आणि दोन्ही सेंटर ५०% भरलेनंतर पुढील इमारतींमध्ये कोविड केअर सेंटर (CCC) सुरु करण्याची कार्यवाही करण्यात यावी या बाबतचा सभावृत्तांत करणेत आलेला आहे. या निर्णयाप्रमाणे घरकुल येथील इमारत क्र. डी-५ आणि डी-६,७,८ मध्ये पूर्ण क्षमतेने रुग्ण दाखल झालेले आहेत. कोविडसाठी कार्यकारणी समिती गठीत करण्यात आलेली आहे त्या समितीच्या दिनांक २३.०३.२०२१ रोजी झालेल्या मिटींग मधील निर्णया प्रमाणे आणि मा.विभागीय आयुक्त कार्यालयाकडुन सूचना प्राप्त झाल्याप्रमाणे आपत्कालीन बाब म्हणून मान्यता देण्यात आली आहे. मे.बि.व्ही.जी इंडिया लि. यांना तातडीची बाब म्हणुन बालेवाडी स्पोर्टस कॉम्पलेक्स येथे २०० बेडसाठी कोविड केअर सेंटर चालु करणेबाबत र.रु.६६,२४,६००/- (अक्षरी र.रू.सहासष्ठ लाख चोवीस हजार सहाशे फक्त) दि.०६.०४.२०२१ ते ०५.०६.२०२१ पर्यंत चे कामकाज आदेश देणेत आलेला असल्याने सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२२४ विषय क्रमांक – २१

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – अ क्षेत्रिय, आरोग्य

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.निता पाडाळे

संदर्भ – मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र.अक्षेका/आ/२/कावि/१७०/२०२१, दि.०१/०४/२०२१

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अ क्षेत्रीय कार्यालय, आरोग्य विभागामार्फत डेंग्यू/ मलेरिया आजारांचा प्रादु र्भाव रोखण्यासाठी औष्णिक धुरीकणकामासाठी ३ पिकअप व्हॅन/रिक्षा टेम्पो वाहने भाड्याने पुरविणे कामाची मुदत दि.०२/०४/२०२१ रोजी संपुष्टात येत असल्याने सदर कामाची निविदा प्रस्तावीत आहे. तथापी त्यासाठी काही कालावधी लागणार असल्याने कामाची निकड विचारात घेता सदरचे कामास मुदतवाढ देणे आवश्यक असल्याने सध्या कामकाज करणारी संस्था मे.रामचंद्र एन्टरप्रायजेस यांना निविदा नोटीस क्र.९/२०१८-१९ च्या मान्य निविदा दराने म्हणजेच र.रु.५९५.१९ प्रति वाहन प्रति दिन या प्रमाणे ३ वाहने दिनांक

०३/०४/२०२१ पासून ३ महिने अथवा नविन निविदा कार्यवाही प्रस्तावित होऊन कामाचे आदेश देईपर्यतच्या कालावधीसाठी मुदतवाढ देणे व याकामी येणा-या अंदाजे र.रु.१,३९,२७४/- (अक्षरी र.रू.एक लाख एकोणचाळीस हजार दोनशे चौ-याहत्तर फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२२५ विषय क्रमांक – २२
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे
संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/१०७/२०२१, दि.३१/०३/२०२१

मा.अति.आयुक्त (१) यांची शिफारस विचारात घेऊन –

भारतीय साथरोग अधिनियम 1897, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना दि.14/03/2020 आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 कलम (41 व 50), महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणूचा (COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मनपामार्फत स्थापन केलेल्या Covid Care Center व Institutional Quarantine Center येथील रुग्ण तसेच व्यक्तिंना व मनपा व शासनाने नियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टा उपलब्ध करुन देणेकामी ई निविदा सूचना क्रमांक 10/2020-21 अन्वये प्राप्त झालेला लघुत्तम दर र.रु.180/- प्रति दिन प्रति व्यक्ति यानुसार एकूण 15 पुरवठादार निश्चित करणेत आलेले आहेत. त्यानुषंगाने निर्गत करणेत आलेल्या पुरवठा आदेशानुसार पुरवठादारांना अदा कराव्या लागणा-या र.रु.180/- प्रति दिन प्रति व्यक्ति याप्रमाणे सबंधित पुरवठादारांनी प्रति दिन दुपारचे/रात्रीचे यापैकी ज्या वेळेस कमाल जेवणाचा पुरवठा केलेला आहे त्यानुसार सबंधित कोविड केअर सेंटरचे पाक्षिक अहवाल विचारात घेऊन प्रस्तावात नमुद केलेल्या कालावधीमध्ये होणा-या र.रु.4,80,240/- (अक्षरी र.रू.चार लाख ऐंशी हजार दोनशे चाळीस फक्त) चे खर्चास मान्यता व पुरवठादार मे.हॉटेल बर्ड व्हॅली यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेची मा.अति.आयुक्त(१) यांची मागणी असली तरी, प्रस्तूत विषयातील कोरोना विषाणूचा (COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मनपामार्फत स्थापन केलेल्या Covid Care Center व Institutional Quarantine Center येथील रुग्ण तसेच व्यक्तिंना व मनपा व शासनाने नियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टा उपलब्ध करुन दिला जातो. त्याकरिता सध्याचा दर र.रू.१८०/- प्रति दिन/प्रति व्यक्ती असा आहे. सध्या दिल्या जाणा-या जेवण व नाष्टा यांची Quantity व Quality अधिक चांगली होणे गरजेचे आहे. तसेच त्यामध्ये प्रथिनांचा अधिक प्रमाणात समावेश करण्यात यावा. त्यासाठी सध्या दिल्या जाणा-या चपाती, भात, भाजी यांचे प्रमाणात वाढ करावी तसेच दोन अंडी व शेंगदाणा लाडू देण्यात यावा. त्याकरिता या दरामध्ये र.रू.५०/- वाढ करून प्रतिव्यक्ती/प्रतिदिन र.रू.१८०/- ऐवजी र.रू.२३०/- असा दर निश्चित करणेस व सदरचा दर सर्व जेवण, नाष्टा पुरविणा-या पुरवठाधारकांना लागू करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२२६ विषय क्रमांक – २३
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – वैद्यकिय मुख्यालय
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/३७३/२०२१, दि.०५/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३) नुसार Covid-19 या विषाणूचा प्रादुर्भाव लक्षता घेता, अत्यावश्यक बाब म्हणून मागविण्यात आलेल्या EOI – 06/2020-21 मधील अटी-शर्तीस अधिन राहुन ऑटो क्लस्टर येथे एक्सप्रेशन ऑफ इन्ट्रेस्टचे अनुषंगाने ५० खाटांचे आय.सी.यु. व १५० खाटांचे ऑक्सीजन बेड कार्यान्वित करणेबाबतच्या एक्सप्रेशन ऑफ इन्ट्रेस्टमधील अटी-शर्ती विचारात घेऊन प्रकरणांची छाननी करणेकामी गठीत करण्यात आलेल्या समितीची दिनांक २१/०८/२०२० रोजी झालेली मिटींग तसेच मा.स्थायी समिती ठराव व मे.स्पर्श हॉस्पिटल यांचे समवेत झालेल्या करारनाम्यास अधिन राहून 50 ICU Beds करीता प्रति बेड प्रति दिवस र.रु.६,४५०/- व 150 Oxygenated Beds करीता प्रति बेड प्रति दिवस र.रु.१,९५०/- प्रमाणे दिनांक २८/०२/२०२१ पासून पुढील तीन महिने कालावधीसाठी म्हणजेच दिनांक २७/०४/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यास व येणा-या अंदाजे र.रु.२,५०,२३,९००/- (अक्षरी र.रू.दोन कोटी पन्नास लाख तेवीस हजार नऊशे फक्त) चे खर्चास व सदर ठिकाणी दाखल झालेल्या रुग्णांना र.रु.१८०/- प्रमाणे प्रति रुग्ण जेवण देण्यास व सदर ठिकाणी हाऊस किंपींग काम करणेकामी र.रु.२४,०७७/- प्रति कर्मचारी (३० कर्मचारी) उपलब्ध करणेकामी कार्योत्तर मान्यता तसेच सदर खर्च मध्यवर्ती भांडार विभागाकडील “कोरोना निधी” या लेखाशिर्षामधून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२२७ विषय क्रमांक – २४
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – विद्युत मुख्यालय
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांचे पत्र क्र.विमुका/४/कावि/४८६/२०२१, दि.०५/०४/२०२१

मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील निविदा नोटीस क्र.34-13/2020-2021 अन्वये प्रभाग क्र.२३ मधील मनपाचे विविध इमारतींवर सोलर सिस्टिम बसविणे (नविन हॉस्पिटल इमारत) या कामाकरीता मे.प्रोसुमर्स सोलर निविदा र.रु.33,20,792/- (अक्षरी र.रु.तेहतीस लाख वीस हजार सातशे ब्याण्णव फक्त) पेक्षा -17.50% कमी या ठेकेदाराकडून काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२२८ विषय क्रमांक – २५

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांचे पत्र क्र.विमुका/४/कावि/४८५/२०२१, दि.०५/०४/२०२१

विषय - प्रभाग क्र.24 थेरगाव मधील आरक्षण क्रमांक 628 खेळाच्या मैदानावर विद्युत विषयक कामे करणेबाबत.

विषय क्र.२५ चा विचार दि.१२/०५/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२२९ विषय क्रमांक – २६

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१८/कावि/११३/२०२१, दि.०६/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिं.चिं.मनपाच्या मध्यवर्ती साहित्य भांडर विभागाने, आण्णासाहेब मगर स्टेडीयम येथील Jumbo Covid Hospital यांनी दिलेल्या मागणीनुसार कोरोना रुग्णांच्या उपचाराकरीता आवश्यक वैद्यकिय ऑक्सिजन द्रव गॅसचा $O_2$ पुरवठा मनपा अधिनियम कलम ६३(६) व ६७(३)(क), आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ व भारतीय साथरोग अधिनियम १८९७ नुसार तात्काळ खरेदी करणेसाठी संबंधित उत्पादित कंपनी/त्यांचे अधिकृत विक्रेते, अथवा अधिकृत पुरवठादार यांनी अल्प मुदतीची जाहिर सुचना क्र.१८/२०२०-२१ नुसार लघुत्तम पुरवठाधारक मे.गॅब एंटरप्रायजेस, पिंपरी यांचे र.रु.२४.५० (+जीएसटी) Per m3 rates प्राप्त दर स्विकृत करुन अंदाजे र.रु.२,४७,२०,६९६/- (अक्षरी र.रु.दोन कोटी, सत्तेचाळीस लाख वीस हजार सहाशे शहाण्णव फक्त) पर्यंतच्या खर्चास मा.स्थायी समिती सभेने ठराव क्र.७४७८, दिनांक १६/०९/२०२० रोजी मान्यता दिली आहे. सदरची पुरवठ्याची प्रथमतः मुदत दि.११/१२/२०२० रोजी पुर्ण झाली व सदर Jumbo Covid Hospital दिनांक १६/०१/२०२१ पर्यंत चालु असल्याने मे.गॅब एंटरप्रायजेस, पिंपरी यांना दिनांक १५/०१/२०२१ पर्यंत मा.स्थायी समिती सभेने ठराव क्र.८३६६, दिनांक १०/०२/२०२१ अन्वये मुदतवाढ देणेत आली होती. कोरोना रुग्ण संख्येत अचानक वाढ झालेने Jumbo Covid Hospital पुन्हा दिनांक ०१/०४/२०२१ ते दिनांक ३१/०५/२०२१ रोजीच्या कालावधीत चालु करण्यात येत असल्याने अल्प मुदतीची जाहिर सुचना क्र.१८/२०२०-२१ मधील वरील मंजुर दराने व नियुक्त केलेले पुरवठाधारक मे.गॅब एंटरप्रायजेस, पिंपरी यांना २ महिने कालावधी अथवा र.रु.१,६४,४९,१९३/- खर्ची होईपर्यंत अथवा पुढील निविदा प्रसिध्द करुन पुरवठाधारक निश्चीत होईपर्यंत, यातील जी कार्यवाही प्रथम होईल तो पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२३०　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक – २७
दिनांक – १५/०४/२०२१　　　　　　　　　　　　　　विभाग – वैद्यकिय
सुचक – मा.शशिकांत कदम　　　　　　　　　　　　　　अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/२८९/२०२१, दि.०६/०४/२०२१

विषय - अण्णासाहेब मगर स्टेडियम येथील जंबो कोविड रुग्णालय सुरू करणेबाबत.

विषय क्र.२७ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२३१　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक – २८
दिनांक – १५/०४/२०२१　　　　　　　　　　　　　　विभाग – वैद्यकिय
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे　　　　　　　　　　　　　　अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/२८८/२०२१, दि.०६/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये फेब्रुवारीच्या दुस-या आठवड्यात कोरोना रुग्णांची संख्या पुन्हा वाढु लागली आहे. सध्या महानगरपालिकेमार्फत ऑटो क्लस्टर येथे ५० बेड आयसीयु चालु करण्यात आलेले आहे. या कामी दि.०३.०९.२०२१ रोजी आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच वाय.सी.एम.एच. येथील १५ बेडचे दोन आयसीयु ऑगस्ट-२०२० पासुन चालु करण्यात आलेले आहेत. जुलै महीन्यामध्ये कोरोना प्रादुर्भाव वाढला असता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे (PMRDA) यांचे कडुन EOI क्र.०३/२०२०-२१ प्रसीध्द करण्यात आली होती. त्यामध्ये मे.मेडब्रोज हेल्थकेअर डायग्नोस्टिक सेंटर कामाचे आदेश क्र.EG/BCH/07.20/प्र.क्र६१२/१३००/शाखा-१ दि.२४.०८.२०२० देण्यात आलेले होते. मा.आयुक्त, मा.महापौर, मा.अति.आयुक्त क्र.१ तसेच इतर पदाधिकारी आणि अधिकारी यांचे समवेत दिनांक २२.०३.२०२१ रोजी मिटींग आयोजीत केली असता झालेल्या चर्चे प्रमाणे प्रथम टप्प्यात कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथील जंबो कोविड रुग्णालय सध्या २०० बेड साठी (त्यामध्ये १०० बेड ऑक्सीजनयुक्त, ५० आयसीयु, ५० एचडियु) दोन महिने कालावधीसाठी चालु करणेकामी आदेश देण्यात आलेले आहेत. दुस-या टप्प्यात वाढीव २०० बेड (त्यामध्ये १०० बेड ऑक्सीजनयुक्त, १० आयसीयु, ९० एचडियु) या प्रमाणे आदेश देणेत आलेले आहेत. एकूण ४०० बेडसाठी आत्तापर्यंत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. ५०% Occupancy झालेनंतर पुढील आदेश देण्यात यावेत तसेच मागील वर्षी PMRDA ने ज्यांना काम दिले होते त्याच संस्थांना PMRDA च्या करारनाम्यानुसार व पुणे महानगरपालिकेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार/ बिल अदायगी धोरणानुसार कामे देण्यात यावीत असे ठरले होते. त्यामुळे दि.०५.०४.२०२१ रोजी ४०० पैकी सुमारे २८० बेडस् भरल्याने पुढील आदेश देण्यात आले आहेत. मे.मेडब्रोज हेल्थकेअर डायग्नोस्टिक सेंटर यांचे कडुन पुढील प्रमाणे दर आकारण्यात आलेले होते.

१. ऑक्सीजन युक्त बेड र.रु.१४०४.४८ प्रति बेड प्रति दिन.
२. एचडियु बेड र.रु.३८४३.८४ प्रति बेड प्रति दिन.
३. आयसीयु बेड र.रु.४३८५.९२ प्रति बेड प्रति दिन.

पुढील २०० ऑक्सीजनयुक्त बेडसाठी मे.मेडब्रोज हेल्थकेअर डायग्नोस्टिक सेंटर यांचेकडुन मनुष्यबळ उपलब्ध करुन घेतले जाणार आहे. रुग्णांना जेवण महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येणार आहे. यासाठी त्यांना PMRDA कडील मुळ आदेशामध्ये नमुद केले प्रमाणे तसेच पुणे महानगरपालिकेकडील आदेशातील व करारनाम्यातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहणार आहेत. वाढती रुग्णसंख्या विचारात घेता भारतीय साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३) क नुसार कोरोना विषाणुचा (COVID-19) प्रादुर्भाव लक्षात घेता सदर बाब तातडीची असेलेने वाढीव २०० बेडसाठी (ऑक्सीजन युक्त) आदेश देण्यात आलेले आहेत. एकूण र.रु.१,७१,३४,६५६/- (अक्षरी र.रू.एक कोटी एक्काहत्तर लाख चौतीस हजार सहाशे छप्पन्न फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२३२ विषय क्रमांक – २९

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/अ-मुख्य/कावि/१०९/२०२१, दि.०५/०४/२०२१

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभाग अ मुख्यालयाकडील प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ (1 ते 13) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२३३ विषय क्रमांक – ३०

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.मभां/८/कावि/५५३/२०२१, दि.०६/०४/२०२१

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सद्याची अपवादात्मक व गंभीर परिस्थिती निर्माण झाली असल्याने "कोरोना" आजाराचा प्रादुर्भाव लक्षात घेता, त्याचा मुकाबला करण्याकरिता आवश्यक असणा-या अत्यावश्यक व तातडीची बाब म्हणुन भारतीय साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 व महापालिका अधिनियम कलम 63(6) मधील तरतुद विचारात घेता वरील संसर्गजंन्य रोग नियंत्रणात आणणेसाठी, प्रतिबंधात्मक उपाय करणे आवश्यक असलेने महानगरपालिकेच्या हद्दीतील कोरोना विषाणूचा होत असलेला प्रसार रोखणे बाबतच्या उपाय योजनांसाठी Inj.Remdesivir 100mg खरेदी करणेकामी ई.नि.सु.क्र.55/2020-21 अन्वये लघुत्तम निविदाकार मे.लक्ष्मी मेडीकल यांचेकडुन प्राप्त झालेला निविदा लघुत्तम दर र.रु.660.80 प्रती Vials (सर्व करासहित) स्विकृत करण्यात आलेला असुन त्यानुसार 7050 Vials खरेदी कारावयाचे आहे. Inj.Remdesivir 100mg खरेदी करणेकामी एकूण र.रु.46,58,640/-(अक्षरी र.रू.शेहेचाळीस लाख अठ्ठावन्न हजार सहाशे चाळीस फक्त) (सर्व करांसहित) इतका खर्च होणार आहे. सदरचा

दर हा निविदेतील अंदाजपत्रकीय दर र.रु.1051.680 प्रती Vials पेक्षा 37.16% ने कमी असलेने स्विकृत करण्यात आलेला आहे. सदर खर्चास महापालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता व मे.लक्ष्मी मेडीकल्स यांचेशी कार्योत्तर करारनामा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२३४ विषय क्रमांक – ३१

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – लेखा

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/३१/कावि/७५/२०२१, दि.०६/०४/२०२१

विषय - सन २०२०-२१ ची अंदाजीत संचलनतूट व विविध प्रकारचे पासेसपोटी रक्कम अग्रिम अदा करणेबाबत.(एप्रिल २०२१)

विषय क्र.३१ चा विचार दि.१२/०५/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२३५ विषय क्रमांक – ३२

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – स्थापत्य ह मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ह-मुख्य/५५८/२०२१, दि.०७/०४/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.43/110/2020-21 अन्वये प्रभाग क्र.32 मधील ममतानगर, नॅशनल स्कूल, प्रियदर्शनीनगर इ. ठिकाणी अंतर्गत भागात व आजूबाजूच्या परिसरात आवश्यकतेनुसार स्थापत्य विषयक व इतर अनुषंगिक कामे करणेकामी मे.सुजाता कन्स्ट्रक्शन नि.र.रू.29,99,896/- (अक्षरी र.रु.एकोणतीस लाख नव्यान्नव हजार आठशे शहान्नव फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,27,596/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,27,596/- पेक्षा 6.01% कमी म्हणजेच र.रु.27,51,647/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.6,501/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.72,300/- = एकुण र.रु.28,30,448/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२३६ विषय क्रमांक – ३३
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – वाय.सी.एम.एच.
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.YCMH/फार्मा/स्टो/कावि/५१/२०२१, दि.०६/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय व इतर दवाखाने/ रूग्णालयांकरिता तातडीने आवश्यक असलेल्या औषधे/साहित्य पुरवठ्याकामी ई-निविदा क्र.१/२०१९-२०, दि.२६/०६/२०१९, निविदा र.रू.अंदाजे १.०० कोटी, नुसार मे.ओमनी हेल्थकेअर सिटीकेअर फार्मसी, मे.कोठारी मेडिकल, पिंपरी व मे.रूबी अलकेअर सर्व्हिसेस प्रा.लि यांचेकडून ब्रँडेड औषधांचे M.R.P. वर १५.५०% सुट, जेनेरीक औषधांचे M.R.P. वर ५६.७०% सुट व सर्जीकल साहित्याचे M.R.P. वर ५४.००% सुट या दर करारा नुसार तातडीने आवश्यक औषधे/साहित्य पुरवठा करणेकामी एजन्सी निश्चीत करणेत आली असुन, ठराव क्रमांक ६६३४, दि.०५/०२/२०२० अन्वये मा.स्थायी समिती सभेने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर पुरवठादारकांस दोन वर्षे कालावधीकरिता दैनंदिन आवश्यक्तेनुसार औषधे/साहित्य पुरविणेकामी आदेश क्र.वायसीएमएच/ फार्मा/स्टो/कावि/५०/२०२०, दि.०१/०४/२०२० अन्वये निविदेद्वारे निश्चीत केलेल्या दराने औषध/साहित्य पुरविणेकामी पुरवठा आदेश देण्यात आला आहे, निविदेची मुदत दि.३१/०३/२०२२ पर्यंत आहे. कोवीड-१९ या संसर्गजन्य आजारामुळे अचानक उद्भवलेल्या परिस्थितीत तातडीने औषध/साहित्य खरेदी करिता या निविदे अन्वये र.रू.३.५० कोटीचे वाढीव खर्चास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.७९७७, दि.१३/०१/२०२१ अन्वये मान्यता दिलेली आहे, तथापि सदर वाढीव खर्चाची मर्यादा संपुष्ठात आलेने व र.रू.१.७० कोटीची तातडीक औषधे/साहित्य खरेदीची बिले प्रलंबीत असल्याने, तसेच सदर निविदेची मुदत दि.३१/०३/२०२२ पर्यंत असल्याने प्रलंबित बिलांचे रकमेसह वाढीव र.रू.३.५० कोटी या प्रमाणे एकुण र.रू.५.२० कोटी खर्चास भारतीय साथरोग अधिनियम १८९७, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसुचना दि.१३ व १४ मार्च २०२०, आपत्ती व्यवस्थापन कायदा कलम ४१ व ५० महानगरपालिका अधिनियम कलम ६३ (६) व कलम ६७ (क) नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२३७ विषय क्रमांक – ३४
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – क क्षेत्रिय
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र.कक्षे/आ१५ब/कावि/१७२/२०२१, दि.०५/०४/२०२१

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत आरोग्य विभागाकडील वाहन क्रमांक वाहन क्र.एम.एच.१४ सि.एल.२४९ टाटा सुमो या वाहनाकरीता मा.अतिरिक्त आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचा दि.०४/०३/२०२१ चा मंजुर प्रस्ताव व आदेश जा.क्र.कक्षे/आ१५ब/कावि/८२/२०२१ दि.०४/०३/२०२१ अन्वये ट्युबलेस टायर खरेदीकामी र.रू.२६,२५९/- (अक्षरी र.रू.सव्वीस हजार दोनशे एकोणसाठ फक्त) आगाऊ घेणेत आलेली

होती. सदरचे नवीन ट्युबलेस मे.सिएट कंपनीचे प्रोफॉर्मा इनव्हाईस क्र.२२४ दिनांक २३/०२/२०२१ नुसार दिनांक २५/०३/२०२१ रोजी ५ नग ट्युबलेस टायर खरेदी केली असून प्रत्यक्ष झालेला खर्च र.रू.२६,२५९/- (अक्षरी र.रू.सव्वीस हजार दोनशे एकोणसाठ फक्त) मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२३८ विषय क्रमांक – ३५

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – स्थापत्य ब मुख्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/२ब/८१८/२०२१, दि.०६/०४/२०२१

विषय - श्री मोरया गोसावी भक्तांसाठी देऊळ मळा परिसरामध्ये विविध सोयी सुविधा करणेसाठी स्थापत्य विषयक काम करणेबाबत.

विषय क्र.३५ चा विचार दि.१२/०५/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२३९ विषय क्रमांक – ३६

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – स्थापत्य ब मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/२ब/८१९/२०२१, दि.०७/०४/२०२१

विषय - सन २०२०-२१ मध्ये किवळे गावठाण येथे पेव्हिंग ब्लॉक व स्थापत्य विषयक कामे करणेबाबत.

विषय क्र.३६ चा विचार दि.१२/०५/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२४० विषय क्रमांक – ३७

दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – स्थापत्य ब मुख्यालय

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.निता पाडाळे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/२ब/८२०/२०२१, दि.०७/०४/२०२१

विषय - सन २०२०-२१ करिता प्रभाग क्र.१६ मध्ये किवळे व रावेत गावठाण भागातील रस्ते आवश्यकतेनुसार खडी मुरुमाचे करणेबाबत.

विषय क्र.३७ चा विचार दि.१२/०५/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२४१ विषय क्रमांक – ३८
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – स्थापत्य ब मुख्यालय
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/२ब/८२१/२०२१, दि.०८/०४/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.74/8/2020-21 अन्वये प्रभाग क्र.१८ चिंचवड येथील पवनानगर बॅडमिंटन हॉल शेजारील मोकळ्या जागेत स्केटिंग रिंग तयार करणेकामी मे.जे.पी.इन्फ्रा नि.र.रू.37,50,000/-(अक्षरी र.रु.सदोतिस लाख पन्नास हजार फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.37,15,650/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.37,15,650/- पेक्षा 24.81% कमी म्हणजेच र.रु.27,93,797/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.31,124/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.34,350/- = एकुण र.रु.28,59,271/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२४२ विषय क्रमांक – ३९
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/१३०/२०२१, दि.०८/०४/२०२१

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम 1897, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना दि.14/03/2020 आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 कलम (41 व 50), महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणूचा(COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मनपामार्फत स्थापन केलेल्या Covid Care Center व Institutional Quarantine Center येथील रुग्ण तसेच व्यक्तिंना व मनपा व शासनाने नियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टा उपलब्ध करुन देणेकामी ई निविदा सूचना क्रमांक 10/2020-21 अन्वये प्राप्त झालेला लघुत्तम दर रु.180/- प्रति दिन प्रति व्यक्ति यानुसार एकूण 15 पुरवठादार निश्चित करणेत आलेले आहेत. त्यानुषंगाने निर्गत करणेत आलेल्या पुरवठा आदेशानुसार पुरवठादारांना अदा कराव्या लागणा-या र.रु.180/- प्रति दिन प्रति व्यक्ति याप्रमाणे सबंधित पुरवठादारांनी प्रति दिन दुपारचे/रात्रीचे यापैकी ज्या वेळेस कमाल जेवणाचा पुरवठा केलेला आहे त्यानुसार सबंधित कोविड केअर सेंटरचे पाक्षिक अहवाल विचारात घेऊन प्रस्तावात नमुद केलेल्या कालावधीमध्ये होणा-या र.रू.7,85,520/- (अक्षरी र.रू.सात लाख पंच्याऐंशी हजार पाचशे वीस फक्त) चे खर्चास मान्यता व मे.बिग ट्री रेस्टॉरंट & बार यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ९२४३ विषय क्रमांक – ४०
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.मभां/०८/कावि/५६८/२०२१, दि.०९/०४/२०२१

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोरोना विषाणु संसर्गाचा धोका निर्माण झाला आहे, कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या Covid-19 या संसर्गजन्य आजारामुळे पिंपरी चिंचवड शहरात आरोग्य विषयक आपत्कालिन परिस्थिती निर्माण झालेली आहे.कोरोना विषाणूंच्या संसर्गाला प्रतिबंध घालण्यासाठी महापालिकेकडून आवश्यक ती दक्षता घेणेत येत असून त्या अनुषंगाने विविध उपाययोजना केल्या जात आहेत. मनपा रुग्णालये, जंम्बो कोविड सेंटर, ऑटो क्लस्टर कोविड हॉस्पिटल या ठिकाणी कोरोना विषाणुमुळे संसर्ग झालेल्या बाधित रुग्णांची संख्या वाढत असुन त्याकरीता Injection Remdesivir 100mg ची मोठ्या प्रमाणात मागणी होत आहे तथापी आवश्यक त्या प्रमाणात पुरवठा होत नसल्याने बाजारात उपलब्ध असलेल्या ठिकाणाहुन औषदे खरेदी करणे आवश्यक आहे. त्यानुसार मे.कुंदन मेडीको, चिंचवड यांचेकडुन 186 Vials थेट पध्दतीने र.रु.925/- + 12% GST = 1036/- (सर्व करासहीत) या दराने एकुण र.रु.1,92,696/- इतका खर्च येणार आहे. सदर खर्चास भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसुचना दिनांक १३/०३/२०२० व १४/०३/२०२० व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधिल कलम ४१ व ५०, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३)(क) तसेच महापालिका अधिनियम अनुसुची प्रकरण ५(२)(२) नुसार मे.कुंदन फार्मा. चिंचवड यांचेकडुन थेट पध्दतीने करारनामा न करता खरेदीकामी येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२४४ विषय क्रमांक – ४१
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१७/कावि/९७/२०२१, दि.०९/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये कोरोना-१९ या संसर्गजन्य आजारामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झालेली असल्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत कोरोनाच्या अटकावासाठी व कोरोनाच्या साथीचा सामना करण्यासाठी त्यानुसार वाढती रुग्ण संख्या विचारात घेता आण्णासाहेब मगर स्टेडीयम (जंबो कोवीड सेंटर, नेहरुनगर) येथे तातडीने व्हेंटीलेटर ची सुविधा उपलब्ध 50 बेडचे आयसीयु तातडीने सुरु करणे आवश्यक असल्याने जंबो कोवीड सेंटर सुरु करताना PMRDA मार्फत विहित कार्यपध्दती राबवुन पुरवठा आदेश दिलेल्या मे.चित्रा सेल्स अँन्ड सर्व्हीस, पुणे यांचेकडून त्यांनी PMRDA ला पुरवठा केलेल्या प्रति नग र.रु.10,55,000/- अधिक जीएसटी पेक्षा र.रु.2,55,000/- ने कमी करुन दिलेल्या दरानुसार म्हणजेच प्रति नग र.रु.8,00,000/- अधिक जीएसटी या प्रमाणे 50 नग व्हेंटीलेटर

र.रु.4,00,00,000/-(अक्षरी र.रु.चार कोटी फक्त) अधिक जीएसटी या प्रमाणे थेट पध्दतीने खरेदी करणेचे खर्चास व मे.चित्रा सेल्स अँन्ड सर्व्हीस, पुणे यांचे बरोबर साथरोग अधिनियम १८९७, शासन सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसुचना दिनांक १३ व १४ मार्च २०२०, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ४१ व ५०, महानगरपालिका अधिनियम ६३(६) व ६७(३)(क), शासन खरेदी नियमावली दि.०१/१२/२०१६ मधील नियम क्र.३.२.६ मधील तुरतुदीनुसार करारनामा करुन घेणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ९२४५ विषय क्रमांक – ४२
दिनांक – १५/०४/२०२१ विभाग – नगररचना व विकास
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१२८/२०२१, दि.१५/०४/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रस्तावात नमूद प्रमाणे मौजे तळवडे येथील गट क्र.३८० पैकी इंद्रायणी नदी लगत म.औ.वि.म च्या सॉप्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क क्षेत्रातील भुखंड क्र.बी-२ मधील ४००० चौ.मी. जागा महानगरपालिकेच्या नियोजित अशुध्द जलउपसा केंद्रासाठी मिळणेकामी मे.सिंटेल इंटरनॅशनल प्रा. लि. यांना DIFFRENTIAL PREMIUM साठी र.रु.७,८०,०००/- तसेच जागेपोटी र.रु.५४,००,०००/- असे एकुण र.रु.६१,८०,०००/- (अक्षरी र.रू.एकसष्ठ लाख ऐंशी हजार फक्त) मे.सिंटेल इंटरनॅशनल प्रा. लि. यांना अदा करणेस तसेच करारनामा करणेपोटी मुद्रांक शुल्क व नोंदणी फी, वकील फी इत्यादी साठी येणारा प्रत्यक्ष खर्च नगररचना व विकास विभागाकडील भुसंपादन निधी या लेखाशिर्षावरुन सदरचा खर्च अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२४६ विषय क्रमांक – ४३
दिनांक – १५/०४/२०२१
सुचक – मा.राजू बनसोडे अनुमोदक – मा.प्रविण भालेकर
संदर्भ – मा.राजू बनसोडे, मा.प्रविण भालेकर यांचा प्रस्ताव –

दापोडी येथील वाढती लोकसंख्या पाहता मोठमोठया इमारतीसह मोठया प्रमाणात हॉटेल व्यावसायिक व उद्योगधंद्यांसह अनेक किरकोळ व्यावसायिकांचा उदरनिर्वाह चालतो. तसेच शेजारी संरक्षण विभागाचे सैन्यमिलिटरी इंजिनिअरींग असल्याने मोठया प्रमाणात झाडेझुडपे आहेत. आकस्मिक एखाद्या वेळेस अग्नितांडव झालेस मोठा अनर्थ नाकारता येत नाही. तरी आपण सदर परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत अ.क्र.३/२७ या ठिकाणी आरक्षित असलेल्या जागेत अग्निशामक केंद्र सुरु करुन दापोडी सोबतच फुगेवाडी, कासारवाडी, सांगवी, पिंपळे गुरव या भागात होणा-या दुर्घटनांना आपण आटोक्यात आणू शकतो. तरी सदर आरक्षित जागेवर अग्निशमन केंद्र सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ९२४७ विषय क्रमांक – ४४

दिनांक – १५/०४/२०२१

सुचक – मा.राजू बनसोडे अनुमोदक – मा.प्रविण भालेकर

संदर्भ – मा.राजू बनसोडे, मा.प्रविण भालेकर यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड शहराचा झपाटयाने होणारा विकास पाहता दापोडी पिंपरी चिंचवड शहराचे प्रवेशद्वार असून त्या ठिकाणी दाट लोकवस्ती असलेल्या ठिकाणी नावलौकीक असलेले विनियार्ड चर्च, एस.टी.कार्यशाळा व भाजी मंडई आहे. त्याठिकाणी नागरीकांचा मोठया प्रमाणात वावर असल्याने त्या ठिकाणी शौचालयाअभावी नागरीकांची गैरसोय होते. त्याची दखल घेत अ.क्र.३/२९ सर्व्हे क्र.८५/अ या ठिकाणी सार्वजनिक शौचालयास जागा आरक्षित असून त्या ठिकाणी शौचालय बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२४८ विषय क्रमांक – ४५

दिनांक – १५/०४/२०२१

सुचक – मा.राजू बनसोडे अनुमोदक – मा.प्रविण भालेकर

संदर्भ – मा.राजू बनसोडे, मा.प्रविण भालेकर यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.३० येथील वाढता युवावर्ग पाहता दापोडी येथे जलतरण तलावाची आवश्यकता आहे. तसेच दापोडी वगळता प्रभागातील कासारवाडी, सांगवी, पिंपळे गुरव या ठिकाणी जलतरण तलाव उपलब्ध आहे. त्याची दखल घेत दापोडीतील अ.क्र.३/३७, सर्व्हे क्र.८२ या ठिकाणी जलतरण तलावासाठी जागा आरक्षित असून दापोडीकरांच्या सोयीच्यादृष्टीने अद्ययावत जलतरण तलाव बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९२४९ विषय क्रमांक – ४६

दिनांक – १५/०४/२०२१

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ – मा.शशिकांत कदम, मा.शत्रुघ्न काटे यांचा प्रस्ताव –

कोरोनाचा संसर्ग टाळण्यासाठी राज्यात कडक लॉकडाऊन लागू करण्यात आला आहे. सद्यपरिस्थितीत सर्वत्र कोरोनाने थैमान घातले असून राज्यात संसर्ग दिवसेंदिवस वाढत आहे. अशा परिस्थितीत कोरोना संसर्ग टाळण्यासाठी राज्यात कडक लॉकडाऊनचा निर्बंध करण्यात आल्याने हातावर पोट असणा-या आर्थिक दुर्बल घटकातील रिक्षा चालक, परवानाधारक फेरीवाले, नोंदणीकृत घरेलू कामगार, चर्मकार (गटई कामगार), नाभिक, शालेय विद्यार्थी वाहतूक करणारे चालक, नोंदणीकृत बांधकाम मजूर, नोंदणीकृत कलाकार, जिम ट्रेनर इ. असंख्य कुटूंबावर आर्थिक संकट ओढावले असून त्यांच्या कुटूंबावर उपासमारीची वेळ आली आहे. याबाबत मा.आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांनी पत्र दिले आहे. तरी पारंपारीक व्यावसाय करुन उदरनिर्वाह चालविणा-

या लोकांचे संपूर्ण व्यावसाय उध्वस्त झाले आहेत. अशा अडचणीच्या काळात शहरातील लोकसंखेची व्याप्ती विचारात घेता व महापालिकेच्या तिजोरीवर आर्थिक ताण पडू नये म्हणून वरील नोंदणीकृत घटकांना प्रति व्यावसायिक र.रु.३,०००/- (अक्षरी र.रू. तीन हजार फक्त) ची आर्थिक मदत देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे)**
सभापती, स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/३/कावि/७६५/२०२१
दिनांक - १६/०४/२०२१



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

(क्र.स्था/नि/अ-मुख्य/कावि/१०९/२०२१ दि.५/४/२०२१ विषय क्र.२९ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८ स्थापत्य अ मुख्यालय
क्र.स्था/नि/अ-मुख्य/१०९/२०२१
दि. ५/४/२०२१

प्रपत्र अ १ ते १३ )

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टी ची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे (+ त्यावरील वस्तु व सेवा कर प्रचलित दराने अदा करावा.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | | १३ |
| १ | मे.दिपाली कंन्स्ट्रक्शान | 45/9/2020-21 | प्रभाग क्र. १४ मधील आकुर्डी दत्तवाडी व परिसरातील मनपा इमारतींची देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (सन २०२०-२१ साठी ) | २५-०२-२१ | स्था/नि/अ-मुख्य/५१/२०२१ | ०३-०३-२१ | १४,९७,७१६ | १४,७९,९१६ | ५,००५ | १७,८०० | ११.०० | % कमी | १३,३९,९३० |
| २ | मे.प्रिझम एन्टरप्राईजेस | 45/12/2020-21 | प्रभाग क्र. १४ मध्ये आकुर्डी तुळजाईवस्ती, विवेकनगर व इतर परिसरामध्ये स्थापत्य विषयक दुरुस्तीची व इतर अनुषंगिक कामे | २५-०२-२१ | स्था/नि/अ-मुख्य/५०/२०२१ | ०३-०३-२१ | १४,९८,९६८ | १४,७८,८६८ | ११,८९६ | २०,१०० | १६.०१ | % कमी | १२,७४,०९७ |
| ३ | मे.भवानी बिल्डर्स | 92/12/2019-20 | प्रभाग क्र. १० मध्ये मनपा इमारतीचे नुतनीकरणाचे व फर्निचर विषयक कामे करणे | १६-१२-२० | स्था/नि/अ-मुख्य/४५/२०२१ | ०१-०३-२१ | २०,६६,७७३ | २०,४९,३७२ | १,२५१ | १६,१५० | २५.२६ | % कमी | १५,४९,१०२ |
| ४ | मे.कोकरे मंडप कॉक्ट्रक्टर | 92/19/2019-20 | प्रभाग क्र. १९ मध्ये विविध कार्यक्रमांसाठी मंडप व्यवस्था पुरविणे. | १९-१०-२० | स्था/नि/अ-मुख्य/३४/२०२१ | १८-०२-२१ | १७,९९,९३२ | १७,९९,९३२ | - | - | १७.५० | % कमी | १४,८४,९४४ |
| ५ | मे.सुमित कन्स्ट्रक्शन | 45/17/2020-21 | प्रभाग क्र. १४ चिंचवड स्टेशन परिसरातील दवाखाना व इतर इमारतींची दुरुस्ती करणे. (सन २०२०-२१) | १७-०२-२१ | स्था/नि/अ-मुख्य/४८/२०२१ | ०३-०३-२१ | १४,९९,७२२ | १४,८१,९२२ | ५,००५ | १७,८०० | १८.२८ | % कमी | १२,३३,८३२ |
| ६ | मे.सुमित कन्स्ट्रक्शन | 45/4/2020-21 | प्रभाग क्र. १४ मध्ये मोहननगर व परिसरातील स्थापत्य विषयक कामे करणे.(सन २०२० -२१ साठी ) | ०६-०१-२१ | स्था/नि/अ-मुख्य/४९/२०२१ | ०३-०३-२१ | १४,९५,५८९ | १४,७५,४८९ | १२,१९४ | २०,१०० | १४.९९ | % कमी | १२,८६,६०७ |
| ७ | मे.एस.एम.कंन्स्ट्रक्शन | 45/3/2020-21 | प्रभाग क्र. १४ मध्ये आकुर्डी दत्तवाडी, विठलवाडी व इतर परिसरामध्ये स्थापत्य विषयक दुरुस्तीची व इतर अनुषंगिक कामे करणे.(सन २०२० -२१ ) | ०३-०३-२१ | स्था/नि/अ-मुख्य/८४/२०२१ | २२-०३-२१ | १४,९२,६४० | १४,७२,५४० | १२,०१५ | २०,१०० | १२.६३ | % कमी | १३,१८,६७३ |

प्रपत्र अ १ ते १३ )

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टी ची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे.(+ त्यावरील वस्तु व सेवा कर प्रचलित दराने अदा करावा.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | | १३ |
| ८ | मे.ओमकार दिपक धवन | 45/13/2020-21 | प्रभाग क्र. १४ काळभोरनगर व परिसरातील स्ट्रॉम वॉटर, फुटपाथ विषयक कामे करणे. (सन २०२०-२१ साठी ) | २५-०२-२१ | स्था/नि/अ-मुख्य/५२/२०२१ | २५-०२-२१ | १४,९९,१८६ | १४,७९,०८६ | १२,०१५ | २०,१०० | १५.१० | % कमी | १२,८७,८५९ |
| ९ | मे.प्रसाद दिलीप राऊत | 45/2/2020-21 | प्रभाग क्र. १४ आकुर्डी, दत्तवाडी व परिसरातील स्ट्रॉम वॉटर, फुटपाथ विषयक कामे करणे. (सन २०२०-२१ साठी ) | १०-०३-२१ | स्था/नि/अ-मुख्य/९८/२०२१ | २४-०३-२१ | १४,७३,४२७ | १४,५३,३२७ | १२,०१५ | २०,१०० | ३३.९९ | % कमी | ९,९१,४५६ |
| १० | मे.प्रसाद दिलीप राऊत | 45/10/2020-21 | प्रभाग क्र. १४ मध्ये चिंचवड स्टेशन, रामनगर व परिसरातील स्थापत्य विषयक कामे करणे.(सन २०२० -२१ साठी ) | ०९-०३-२१ | स्था/नि/अ-मुख्य/९४/२०२१ | २४-०३-२१ | १४,९८,१२३ | १४,७८,०२३ | ११,८९६ | २०,१०० | ३५.९९ | % कमी | ९,७८,०७९ |
| ११ | मे.प्रसाद दिलीप राऊत | 45/7/2020-21 | प्रभाग क्र. १४ चिंचवड स्टेशन, रामनगर व परिसरातील स्ट्रॉम वॉटर, फुटपाथ विषयक कामे करणे. (सन २०२०-२१ साठी ) | १०-०३-२१ | स्था/नि/अ-मुख्य/९७/२०२१ | २४-०३-२१ | १४,९६,९७९ | १४,७६,८७९ | १२,०१५ | २०,१०० | ३५.९९ | % कमी | ९,७७,४६५ |
| १२ | मे.प्रसाद दिलीप राऊत | 45/20/2020-21 | प्रभाग क्र. १४ शुभश्री सोसायटी, मनपा दवाखाना व परिसरातील स्ट्रॉम वॉटर, फुटपाथ विषयक कामे करणे. (सन २०२०-२१ साठी ) | ०९-०३-२१ | स्था/नि/अ-मुख्य/९५/२०२१ | २४-०३-२१ | १४,९९,९४८ | १४,७९,८४८ | ११,७६१ | २०,१०० | ३६.९९ | % कमी | ९,६४,३१३ |
| १३ | मे.प्रसाद दिलीप राऊत | 45/14/2020-21 | प्रभाग क्र. १४ काळभोरनगर, मोहननगर चिंचवड स्टेशन व परिसरातील शाळा इमारतींची दुरुस्ती करणे. (सन २०२०-२१) | १०-०३-२१ | स्था/नि/अ-मुख्य/९८/२०२१ | २४-०३-२१ | १४,९९,५६८ | १४,८१,७६८ | ५,००५ | १७,८०० | ३२.९९ | % कमी | १०,१५,७३८ |

१,५७,०२,०९५

कार्यकारी अभियंता
स्थापत्य अ मुख्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८